## डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ कृषि नगर, अकोला (महाराष्ट्र) ४४४ १०४

## जाहीरात

**क्र. पंदेकृवि/आस्था/जाहिरात/२०१६ (०१)** **दिनांक :- १४ डिसेंबर, २०१६**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला (महाराष्ट्र राज्य) अंतर्गत विविध कार्यालयातील खालील प्रमाणे रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता ऑनलाईन पध्दतीने दिनांक १३-०१-२०१७ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. या जाहीरातीव्दारे भरावयाच्या पदांचा तपशिल व आरक्षण खालील प्रमाणे आहे.

| जाहिराती मधील अक्र. | पदनाम | वेतन बॅन्ड | भरावयाची पदे | समांतर आरक्षण ↓ | सामाजिक आरक्षण → | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ.जा | अज | विज-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
| १ | कृषि सहाय्यक (पदविधर) | ५२००-२०२००/- ग्रे.वे. २४००/- | | महिला | - | - | - | - | - | - | - | ०१ | ०२ | ०३ |
| | | | | माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ |
| | | | | खेळाडु | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | | प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | | अपंग | **एकुण २ पदे** : ०१ - क्षीणदृष्टी, ०१ - श्रवणशक्तीतील दोष | | | | | | | | | |
| | | | | अंशकालीन कर्मचारी | - | - | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ |
| | | | | इतर | ०१ | ०१ | ०१ | - | - | ०१ | ०१ | ०१ | ०४ | १० |
| | | **एकुण पदे** | १५ | | **०१** | **०१** | **०१** | ०० | ०० | **०१** | **०१** | **०२** | **०८** | **१५** |
| | | | | | | | | | | | | | | |
| २ | कृषि सहाय्यक (पदविका) | ५२००-२०२००/- ग्रे.वे. २४००/- | | महिला | ०२ | - | - | - | - | - | - | ०४ | १० | १६ |
| | | | | माजी सैनिक | ०१ | - | - | - | - | - | - | ०२ | ०५ | ०८ |
| | | | | खेळाडु | - | - | - | - | - | - | - | ०१ | ०२ | ०३ |
| | | | | प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | ०१ | ०२ | ०३ |
| | | | | अपंग | **एकुण ४ पदे** : ०१ - क्षीणदृष्टी / ०२ - श्रवणशक्तीतील दोष/ ०१ चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु | | | | | | | | | |
| | | | | अंशकालीन कर्मचारी | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | ०३ | ०५ |
| | | | | इतर | ०१ | - | - | ०१ | - | - | - | ०५ | १३ | २० |
| | | **एकुण पदे** | ५५ | | **०५** | **००** | ०० | **०१** | ०० | ०० | ०० | **१४** | **३५** | **५५** |

**सज्ञांचे अर्थ**

अजा: अनुसुचित जाती, अज : अनुसुचित जमाती, विजा: विमुक्त जाती, भज : भटक्या जमाती, इमाव : इतर मागास प्रवर्ग आणि विमाप्र : विशेष मागास प्रवर्ग

**आरक्षित पदे ही फक्त महाराष्ट्र शासनाने वेळोवळी अधिकृत केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांसाठी आरक्षीत आहेत.**

www.nmk.co.in

**शैक्षणिक अर्हता**

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | कृषि सहाय्यक (पदवीधर) | <u>खालील विषयातुन पदवी परिक्षा उत्तीर्ण</u><br>कृषि / उद्यानविद्या / वनशास्त्र / पशुविज्ञानशास्त्र / कृषि तंत्रज्ञान / कृषि अभियांत्रिकी / गृह विज्ञान / मत्स्य विज्ञान / जैवतंत्रज्ञान. |
| २ | कृषि सहाय्यक (पदविका) | शासनमान्य संस्था किंवा कृषि विद्यापीठामधील पदविका किंवा तिच्याशी समतुल्य म्हणुन मान्यता मिळालेली अशी इतर कोणतीही अर्हता. |

**<u>टिप</u>** :- वरिल नमुद दोन्ही संवर्ग जरी एकच असले तरी, सदरबाबत शैक्षणिक अर्हता वेगवेगळया विहीत करण्यात आलेल्या आहेत त्यामुळे पदवी धारक उमेदवारांनी पदवीका अर्हता असलेल्या पदासाठी तसेच पदवीका धारक उमेदवारांनी पदवी अर्हता असलेल्या पदासाठी अर्ज केल्यास सदर अर्ज अपात्र ठरविण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**परिक्षांचे स्वरूप**

| अ.क्र. | संवर्ग | परिक्षेसाठी गुण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | प्रात्यक्षिक / व्यावसायिक चाचणी परिक्षा | मौखिक परिक्षा | एकुण |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १ | कृषि सहाय्यक (पदविधर) | २०० | -- | -- | २०० |
| २ | कृषि सहाय्यक (पदविका) | २०० | -- | -- | २०० |

१. शासन निर्णय क्रं प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक १९ ऑक्टोबर २००७ तसेच प्रानिमं-१२१४/प्र.क्र.४३/१४/१३-अ, दिनांक ०५ जून २०१४ मधील प्रावधनानुसार वरिल पदांसाठी लेखी परिक्षा घेण्यात येईल आणि लेखी परिक्षेत संबंधीत विषयावरील प्रश्नांचा समावेश असेल. उमेदवारांना लेखी परिक्षेत प्राप्त गुणांचे आधारे गुणाणुक्रमे पर्याप्त संख्येत कागदपत्रे पडताळणी करीता बोलाविण्यात येईल.

२. शासन निर्णय क्र. प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७ जुन, २००८ अन्वये गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी लेखी परिक्षेत किमान ४५ टक्के गुण मिळविणे आवश्यक राहील.

**वयोमर्यादा :**

अ. दिनांक १३-०१-२०१७ रोजी सर्वसाधारणतः उमेदवाराचे वय वर्षे १८ पेक्षा कमी व ३८ पेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवारांकरिता सर्वसाधारण कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथीलक्षम राहील.

ब. शासन निर्णय व कार्यकारी परिषद ठरावानुसार खालील प्रमाणे कमाल वयोमर्यादा विहीत करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | वर्गवारी | कमाल वयोमर्यादा | शेरा |
|---|---|---|---|
| १. | अपंग उमेदवार / प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त | ४५ वर्षे | शासन निर्णयानुसार |
| २. | माजी सैनिकांना विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. तसेच, अपंग माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील कमाल वयोमर्यादा ४५ वर्षेपर्यंत राहील. | | |
| ३. | शासनातील अंशकालीन उमेदवार | ४६ वर्षे | |
| ४. | खेळाडु उमेदवार / स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे नामनिर्देशित उमेदवार (विहित नमुन्यातील नामनिर्देशनपत्र जोडणे आवश्यक) | कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथील | |
| ५. | या विद्यापीठात तसेच महाराष्ट्रातील इतर कृषि विद्यापीठमध्ये नियमीत आस्थापनेवर वेतनश्रेणीत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा. | ५० वर्षे | शासन परिपत्रक दि ०१.११.०३ व का.प.ठराव दि १०.०३.१२ |

www.nmk.co.in

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | राज्य शासन / केंद्र शासन/ निमशासकीय संस्था / शासन अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये नियमित आस्थापनेवर व वेतन श्रेणीमध्ये कार्यरत कर्मचा-यांकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा. | ४५ वर्ष | |

**<u>महत्वाच्या सुचना :</u>**

१) उमेदवारांनी विद्यापीठाचे www.pdkv.ac.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावयाचे असून, अर्ज करण्यासाठी लिंक दि. १५-१२-२०१६ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १३-०१-२०१७ रोजी २४.०० वाजेपर्यंत राहील तदनंतर अर्ज स्वीकारले जाणार नाही. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावी.

२) विद्यापीठाच्या यापुर्वीच्या जाहिराती नुसार एखादया उमेदवाराने अर्ज केला असल्यास सदर उमेदवारास यापुर्वीच्या जाहिरातीचा संदर्भ देवून वयोमर्यादा, प्रक्रीया शुल्क अथवा कुठल्याच प्रकारची शिथीलता अनुज्ञेय असणार नाही. अशा उमेदवारास या जाहिरातीनुसार नव्याने अथवा स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक राहील व अशा अर्जासोबत विहीत रकमेचे शुल्काचा भरणा करणे आवश्यक राहील.

३) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचा असल्याने विद्यापीठाचे संकेतस्थळावर दिलेल्या सुचनांनुसार अचुक माहितीसह ऑनलाईन अर्ज सादर करावा, तसेच अर्जासह कुठलीच कागदपत्रे/पोस्टाव्दारे सादर करण्याची आवश्यकता असणार नाही तसेच ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर उमेदवारास उचीत शुल्काचा भरणा करण्यासाठी चलॉन प्राप्त होईल उमेदवारांने सदर चलॉनव्दारे आवश्यक रकमेचा भरणा फक्त भारतीय स्टेट बँकेच्याच शाखेत करणे अनिवार्य राहील. अर्ज सादर करण्याच्या अखेरच्या दिवशी म्हणजेच दि. १३-०१-२०१७ रोजी चलानव्दारे शुल्काचा भरणा करावयाचा झाल्यास सदर भरणा बँकेच्या वेळेतच करणे आवश्यक राहील त्यामुळे होणा-या विलंबास विद्यापीठ जबाबदार असणार नाही.

४) वरिल प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने प्राप्त माहितीच्या आधारे प्रार्थमीकदृष्टया पात्र असलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात येईल आणि लेखी परिक्षेत प्राप्त गुणांचे आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांना पर्याप्त संख्येत कागदपत्राची पडताळणी करण्यासाठी बोलाविण्यात येईल. पडताळणी दरम्यान कुठलेही आवश्यक दस्तावेज पुरविण्यास उमेदवार असमर्थ असल्यास असा उमेदवार गुणवत्ता यादीमध्ये अग्रक्रमावर असला तरी त्यास अपात्र ठरविण्यात येईल.

५) अर्जदाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना त्यामधील सर्व माहिती व सर्व बाबी काळजीपुर्वक पुर्ण व अचुक भरणे आवश्यक राहील. अर्ज सादर करण्याचे शेवटचे दिनांकास सर्व कागदपत्रे व प्रमाणपत्रे वैध असणे आवश्यक राहील. एकदा अर्ज सादर केल्यानंतर त्यानंतरचे कुठलेही कागदपत्रे व प्रमाणपत्रे ग्राहय धरण्यांत येणार नाही तसेच कोणत्याही कागदपत्रांचा/प्रमाणपत्राचा स्विकार केला जाणार नाही किंवा उमेदवारास त्यामध्ये बदल अथवा दुरूस्ती करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**आवेदन शुल्क**

१. मागावसर्गीय उमेदवारांकरिता रू २५०/-
२. बिगरमागासवर्गीय उमेदवारांकरिता रू ५००/-

**टिप - अपंग व माजी सैनिक उमेदवारांनी परिक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.**

**<u>सर्व साधारण शर्ती/अटी व सुचना :</u>**

| | |
|---|---|
| १) | उमेदवार हा महाराष्ट्रातील रहीवासी व भारतीय नागरीक असावा (पुरावा म्हणून अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्राची प्रत (Domicile & Nationality Certificate) कागदपत्र पडताळणी दरम्यान सादर करणे आवश्यक राहील) |
| २) | उमेदवारास मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे. |
| ३) | उमेदवारांना लेखी परिक्षा व कागदपत्रे पडताळणी करीता नियोजित ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. |
| ४) | रिक्त पदांच्या संख्येत व आरक्षणात कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. तत्कालीन परिस्थितीनुसार परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे वा रद्द करणे किंवा अशंता बदल करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार विद्यापीठाने स्वतःकडे राखून ठेवलेले आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. |

www.nmk.co.in

| | |
|---|---|
| ५) | शारिरिकदृष्टया विकलांग प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यांत आलेल्या पदासाठी सामाजीक आरक्षण लागू असणार नाही. सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल त्या सामाजिक प्रवर्गाच्या उपलब्ध पदावर त्यास सामावुन घेण्यात येईल. तथापी ज्या प्रवर्गासाठी जाहिरातीमध्ये पदच उपलब्ध नसेल अशा प्रवर्गातून अपंग उमेदवाराचा अर्ज प्राप्त झाल्यास असा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. |
| ६) | शारिरिकदृष्टया विकलांग उमेदवारांनी लेखी परिक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास अर्जात तसा स्पष्ट उल्लेख करावा. लेखनिकाची मागणी अर्जात केलेली नसल्यास नंतर विनंतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. |
| ७) | शारिरिकदृष्टया विकलांग प्रवर्गातील उमेदवारांकडे अपंगत्वाचे किमान प्रमाण ४० टक्के असल्याबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. शारिरिकदृष्टया विकलांग प्रवर्गातून गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारास शासन परिपत्रक दि.०६.०५.२००४ मधील प्रावधानानुसार शासनाने नियुक्त केलेल्या वैद्यक मंडळाकडे तपासणीसाठी पाठविण्यात येईल आणि सदर मंडळाने उमेदवार संबधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची नियुक्ती करण्यात येईल अन्यथा त्या उमेदवारास अपात्र ठरविण्यात येवून त्यांची निवड रद्य करण्यात येईल. |
| ८) | महिलांसाठी असलेले आरक्षण हे संबंधित सामाजीक प्रवर्गासाठी समांतर राहील, तथापी संबंधित प्रर्वगातील महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षित असलेली पदे इतरत्र अदलाबदल न करता त्या-त्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र ठरणाऱ्या पुरूष उमेदवारामधून भरण्यांत येतील. |
| ९) | अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसांठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. राकिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ३०-४-२००५ मधील तरतुदीनुसार राहील. |
| १०) | खुल्या प्रवर्गातील खेळाडु किंवा महिला या समांतर आरक्षणाचा लाभ घेण्यास इच्छूक उमेदवारांकडे (अनुसूचित जाती/जमातीसह) खेळाडू व महिला खुला प्रवर्गासाठी आवश्यक व अर्ज सादर करण्याचे शेवटचे दिनांकास वैध असलेले व त्यादिनांकापुर्वी प्राप्त झालेले नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| ११) | अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडील नोंदणी करणे आवश्यक राहील व अर्जदाराकडे नोंदणी प्रमाणपत्र नसल्यास आरक्षणाचा लाभ मिळणार नाही. |
| १२) | शासन परिपत्रक क्र. पीआई/२००४/३८५५/प्रशि-१, दिनांक २ जून २००५ नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये माजी सैनिक अथवा युध्द काळात व युध्द नसतांना सैनिक सेवेत मृत्यु पावलेल्या किंवा अपंगत्व येवून त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटूंबातील फक्त जवानाची पत्नी किंवा अपंग जवानाची पत्नी यांना पात्र समजण्यांत येईल. |
| १३) | समांतर आरक्षणा अंतर्गत पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या-त्या प्रवर्गातुन इतर पात्र उमेदवारातुन गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. |
| १४) | वि.जा.भ.ज., विमाप्र व इमाव प्रवर्गातील सर्व उमेदवारांना सामाजीक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबंधीत उमेदवारांकडे अर्ज सादर करण्याचे शेवटचे दिनांकास वैध असलेले व त्यापुर्वी प्राप्त झालेले नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| १५) | निवड प्रक्रीये दरम्यान लेखी परिक्षेतील गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षणनिहाय उमेदवारांना पर्याप्त संख्येत कागदपत्रांची पडताळणीकरीता बोलाविण्यात येईल त्यावेळेस अर्ज सादर करण्याचे शेवटचे दिनांकास वैध व त्या दिनांकापुर्वी प्राप्त असलेले व ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जामध्ये उमेदवाराने भरलेल्या माहितीनुसारच कागदपत्रे व प्रमाणपत्रे ग्राहय धरण्यांत येतील याव्यतिरिक्त कुठलेच कागदपत्रे ग्राहय धरण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी. |
| १६) | निवड प्रक्रीये दरम्यान अथवा नियुक्तीनंतर कोणत्याहीक्षणी उमेदवारांनी अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास अथवा अर्जदार अपात्र आढळून आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी/नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर तात्काळ रद्द करण्यात येईल. |
| १७) | मागास प्रवर्गातील उमेदवारास त्यांचे प्रवर्गाव्यतिरिक्त खुल्या प्रवर्गा साठीसुध्दा अर्ज करावयाचा झाल्यास त्यांचे व्दारे खुला प्रवर्गाकरीता आवश्यक असलेल्या सर्व शर्ती व अटींची पुर्तता करुन रु. ५००/- शुल्काचा भरणा करणे आवश्यक राहील. |

www.nmk.co.in

| | |
|---|---|
| १८) | शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र बीसीसी२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर, २०११ नुसार मागासवर्गीय प्रवर्गातुन उमेदवाराची निवड झाल्यास अशा उमेदवारास तात्पुरत्या नियुक्तीपासुन ६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधणकारक राहील जे उमेदवार विहीत कालावधीत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास असमर्थ होतील अशा उमेदवारांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील |
| १९) | शासकीय-निमशासकीय सेवेत नियमीत आस्थापनेवर कार्यरत कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने सादर करावे व अशा परवानगीचे पत्र (ना हरकत प्रमाणपत्र) उमेदवारांकडे असणे आवश्यक आहे व ऑनलाईन अर्जामध्ये याची नोंद घेणे आवश्यक राहील. |
| २०) | उपरोक्त पदासाठी रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, (सेवायोजन कार्यालय), आदीवासी प्रकल्प अधिकारी यांचेकडून प्राप्त होणाऱ्या जनगणना/अंशकालीन कर्मचाऱ्यांची शिफारस होणाऱ्या उमेदवारांनी जाहीरातीत नमूद सर्व अटी व शर्तींच्या अधिन राहून त्या-त्या पदांसाठी विहीत आवेदन शुल्क भरून अर्ज करणे बंधनकारक राहील. |
| २१) | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र) नियम २००५ मधील नियम ४ मधील तरतुदीनुसार लहान कुटूंब मर्यादेचे नमूना अ मधील प्रमाणपत्र ऑनलाईन अर्जासह सादर करणे आवश्यक आहे. |
| **२२)** | शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००५ प्रमाणे निवड झालेल्या उमेदवारांना परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू राहील. |
| २३) | या विद्यापीठा व्यतिरिक्त इतर आस्थापनांवरील कार्यरत कर्मचा-याची निवड झाल्यास विद्यापीठ सेवत रूजु होण्याकरीता त्यांना त्यांच्या पुर्वीच्या पदाचा राजीनामा देणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांना विद्यापीठ सेवेत रूजु करून घेतले जाणार नाही. |
| २४) | **अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यांत येईल.** |

उपरोक्त जाहीरात संकेतस्थळ (www.pdkv.ac.in) वर उपलब्ध आहे.

**स्वाक्षरीत/-**
कुलसचिव,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

ठिकाण :- डॉ. पं.दे.कृ.वि.,अकोला
दिनांक :- १४/१२/२०१६.

www.nmk.co.in